imp.document


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web:www.dhepune.gov.in
E-mail : bed.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५९७२९,२६१२२११९.२६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्रमांक उशिसं/२०१६/नाहप्र/प्र.क्र.३३२(२)/बीएड

दिनांक १२.०७.२०१६


Tilak College of Education
Pune - 411030
Inward No 275
Date 15.07.2016.


प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालये,

विषय : अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ : शासन पत्र क्रमांक बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(२)/मशि-२, दिनांक ११.०७.२०१६

उपरोक्त संदर्भीय शासन पत्रान्वये शासनाने अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमास सुधारीत ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. सुलभ संदर्भासाठी शासन पत्राची प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत :

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य, यांना माहिती तथा शासन पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करीता अग्रेषित.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

३. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

most Important document

सौ. गोडबोले अत्यंत महत्वाचे file करावे.

16/7/16

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(२)/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ जुलै, २०१६.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

**विषय:- अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

**संदर्भ :-** (१) शासन परिपत्रक क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.१६२/१५/मशि-२,दि.२१ ऑगस्ट,२०१५ व शासन पुरकपत्रक, समक्रमांक, दि. ०३ ऑक्टोबर, २०१५,
(२) शासन पत्र क्रमांक बीएङ.४६१५/प्र.क्र.३३२/मशि-२, दि.१५.०३.२०१६,
(३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५/ प्र.क्र.१६२/१५/बीएड./६०६०, दिनांक ११.०५.२०१६.

National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 अन्वये राज्यातील अध्यापक महाविद्यालयांना एनसीटीईकडून सुधारीत मान्यतेचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. (१) येथील दिनांक २१.८.२०१५ च्या परिपत्रकान्वये व दि.०३.१०.२०१५ च्या पुरकपत्रकान्वये राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ तसेच भारतीय पुनर्वास परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून सुधारीत मान्यताप्राप्त अध्यापक महाविद्यालयांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन पत्रान्वये सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर स्थापन केलेल्या पथकाने दिलेल्या शिफारशीनुसार संचालक, उच्च शिक्षण यांनी संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये राज्यातील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अनुसरुन सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमांना (बी.एङ.) नमूद विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या युनिटना अनुदान तत्वावर चालविण्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. तसेच, सदर महाविद्यालयांतील उर्वरित तुकडयांना (ज्या अभ्यासक्रमांना (बी.एङ./एम.एङ.) यापुर्वी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे) कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय.,नवी दिल्ली यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.
२) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय., नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.
३) एन.सी.टी.ई.,भोपाळ/आर.सी.आय., नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या अटींची पूर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

४) बी.एड/एम.एड अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत, अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र. १० (ब) व (क) मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे अनुपालन न केल्याचे निदर्शनास आल्यास, सदर शासन निर्णय भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

५) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी केलेल्या सर्व शिफारशी शासनाच्या संदर्भाधिन क्र. १ येथील दि. २१/०८/२०१५ रोजीच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 च्या सुधारीत निकषांची काटेकोर तपासणी करुन केलेल्या आहेत, या धारणेच्या अधीन राहून सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. भविष्यात या संदर्भात उद्भवणारी न्यायालयीन प्रकरणे अथवा अन्य आक्षेपांची संपूर्ण जबाबदारी संबंधित सहसंचालकांची राहील.

६) सर्व विभागीय सहसंचालकांनी संबंधित अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींबाबत व सदर त्रुटींची पुर्तता लवकरात लवकर करण्याबाबत अवगत करावे. एनसीटीईकडून होणाऱ्या तपासणीदरम्यान, एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता न केल्याच्या कारणास्तव सदर महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांची मान्यता रद्द केल्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात यावे.

( रोहिणी भालेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
सर्व संबंधित अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत)
निवडनस्ती (मशि-२)

## शासन पत्र क्रमांक : बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(२)/मशि-२,
## दि.११ जुलै, २०१६ चे
## परिशिष्ट

### अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये (बी.एड.)

| अ.क्र. | विभाग | महाविद्यालयांचे नांव | अनुदानित तत्वावर शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त युनिट |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पनवेल विभाग | सेवा सदन संस्थेचे<br>सेवा सदन कॉलेज ऑफ एज्युकेशन, उल्हासनगर, जि. ठाणे. | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट याप्रमाणे **दोन** (एक इंग्रजी व एक मराठी) युनिटअनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| २ | जळगांव विभाग | खान्देश एज्युकेशन सोसायटीचे के.सी.ई. सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगांव | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थ्यांचे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | जनता शिक्षण मंडळ, खिरोदा, ता. रावेर, जि. जळगांव या संस्थेचे साने गुरुजी विद्याप्रबोधिनी सर्वसमावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, खिरोदा ता. रावेर, जि. जळगांव | |
| | | धुळे एज्युकेशन सोसायटी, धुळे या संस्थेचे<br>धुळे एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे | |
| | | नंदुरबार तालुका विधायक सामिती, नंदुरबार या संस्थेचे, न.ता.वि.स. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार | |
| ३ | पुणे विभाग | मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेचे<br>अॅड विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट याप्रमाणे **तीन** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे<br>या संस्थेचे<br>टिळक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे<br>30 | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट याप्रमाणे **दोन** युनिट अनुदानित तत्वावर |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | **मुंबई विभाग** | साधना एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे श्रीमती कपिला खांडवाला कॉलेज ऑफ एज्युकेशन | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति **युनिटप्रमाणे एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | गुजरात रिसर्च सोसायटी या संस्थेचे हंसराज जीवनदास कॉलेज ऑफ एज्युकेशन | |
| | | गांधी शिक्षक भवन या संस्थेचे श्रीमती सुरजबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, जुहू रोड | |
| | | चेंबूर एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय | |
| | | सेंट झेविअर्स इन्स्टिटयुट या संस्थेचे सेंट झेविअर्स इन्स्टिटयुट ऑफ एजयुकेशन, मुंबई | |
| | | मुंबई पोर्ट ट्रस्ट या संस्थेचे बॉम्बे टिचर्स ट्रेनिंग कॉलेज, मुंबई | |
| | | सेंट टेरेसा ट्रस्ट या संस्थेचे सेंट टेरेसा इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, मुंबई | |
| | | एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई या विद्यापीठाचे पी.व्ही.डी.टी. कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमेन, मुंबई | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिट याप्रमाणे **दोन** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | गोखले एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, परळ, मुंबई | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून ५० विद्यार्थी प्रति युनिटप्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |
| | | हशु अडवाणी एज्युकेशन सोसायटीचे, हशु अडवाणी कॉलेज ऑफ स्पेशल एज्युकेशन, चेंबुर, मुंबई | एनसीटीईच्या सुधारित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून २० विद्यार्थी प्रति युनिटप्रमाणे **एक** युनिट अनुदानित तत्वावर चालविण्यास शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. |

-----